N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** सांगली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0285 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/06/2024 00:34

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 05/06/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/06/2024

**Time From (वेळेपासून):** 11:46 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:56 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/06/2024 **Time (वेळ):** 00:05 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/06/2024 00:34 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सांगली शहर

**(c)In case, outside the limit of this Police Station, then**

**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. दशरथ शामराव खोत

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** शामराव खोत

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेखरवाडी, वाळवा, ता वाळवा जि, शेखरवाडी, वाळवा, ता वाळवा जि, सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेखरवाडी, वाळवा, ता वाळवा जि, शेखरवाडी, वाळवा, ता वाळवा जि, सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सपना सुखदेव घोळवे | | पती का नाम : सुखदेव घोळवे | 1. रूम नं बी-9, वक्रतुंड सोसायट, रूम नं बी-9, वक्रतुंड सोसायट, सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | दिपक भगवान पाटील | | वडील का नाम : भगवान पाटील | 1. लोटेवाडी, तासांगोला जिसांगल, लोटेवाडी, तासांगोला जिसांगल, सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned with OKEN Scanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि. 06.06.2024

मी दशरथ शामराव खोत, वय 38 वर्ष, व्यवसाय:- शेती रा. शेखरवाडी, वाळवा, ता. वाळवा जि. सांगली. मो.नं. 9860393938

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. श्री.सदाभाऊ खोत यांनी रामरत्न एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली असून सदर सोसायटीचे अंतर्गत एस.के. इंटरनॅशनल स्कुल रेठरेधरण व एस.के.माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा जाक्राईवाडी या दोन शाळा आहेत. सदाभाऊ खोत हे माझे नात्याने मामा असल्याने त्यांनी संस्थे अंतर्गत असणा-या शाळांची प्रशासकीय काम पाहण्याची सर्वस्वी जबाबदारी माझ्यावर सोपवलेली आहे. एस. के. इंटरनॅशनल स्कुल रेठरेधरण या शाळेस महाराष्ट्र शासनाकडून भटक्या जमाती क प्रर्वगातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांना नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे या योजनेअंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या शाळेला सन 2023-24 या शैक्षणिक वर्षाकरीता देय असलेले रू. 59,40,000/- अनुदान मंजूर करण्यात आले असून त्यापैकी 50 टक्के अनुदानाची रक्कम 29,70,000/- रूपयेचा चेक शाळेस देण्यात आलेला आहे.

दि. 24.05.2024 रोजी श्रीमती घोळवे, सहाय्यक संचालक बहुजन कल्याण विभाग सांगली या एस.के. इंटरनॅशनल स्कुल रेठरेधरण येथे भेट देण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी मी शाळेमध्ये हजर होतो. श्रीमती घोळवे यांनी शाळेचे पाहणी करून शाळेस रू. 59,40,000/- अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. अनुदानाचा पहिला हप्ता 29,70,000/- रूपये देण्यात आला असून दुसरा हप्ता 29,70,000/- रूपये येणे बाकी आहे असे सांगून पहिला हप्ता दिल्याचा मोबदला म्हणून 10 टक्के व दुसरा हप्ता मंजुर करण्यासाठी 10 टक्के असे एकुण 59,40,000/- रूपये रक्कमेच्या 10 टक्के म्हणजेच सुमारे 6,00,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगून त्यांनी माझ्याकडे 6,00,000/- रूपयांची लाचेची मागणी केली.

सदर विषय मी संस्थापक अध्यक्ष श्री.सदाभाऊ खोत यांना सांगितला. त्यावेळी आमच्यामध्ये झालेल्या चर्चेमधून श्रीमती घोळवे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 05.06.2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली व पोलीस निरीक्षक, श्री.विनायक भिलारे यांची कार्यालयामध्ये भेट घेवून माझी श्रीमती घोळवे, सहाय्यक संचालक बहुजन कल्याण विभाग सांगली यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार सांगितली. त्यावेळी भिलारे साहेबांनी ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज भिलारे साहेबांचे समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर भिलारे साहेब यांनी वाचून सही केली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेवून माझी व पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझेकडील कारने एसीबी कार्यालयातून रवाना होवून वृंदावन गार्डन मंगल कार्यालय, बायपास रोड सांगली येथे दाखल झालो. माझे पाठोपाठ भिलारे साहेब, पाटील साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनांनी सदर ठिकाणी दाखल झाले.

त्यानंतर श्रीमती घोळवे, सहाय्यक संचालक बहुजन कल्याण विभाग सांगली यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी



Scanned with OKEN Scanner

मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली व सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. दत्तात्रय पाटील यांनी व पंच नं.2 म्हणून श्रीमती शैलजा गायकवाड यांनी काम करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 पाटील असे माझेकडील किया सेलटॉस एमएच 10 ईएफ 1015 मधून रवाना होवून समाज कल्याण विभाग येथे दाखल होवून इतर बहुजन कल्याण विभाग येथे श्रीमती घोळवे यांची भेट घेणेकरीता जात असताना दिपक पाटील, निरीक्षक हे भेटले. त्यावेळी दिपक पाटील यांनी मला चेकच पेंडींग राहिल होत असे सांगितले. त्यावर मी त्यांना कुठल्या, आश्रम शाळेच, किती रूपये? असे विचारले असता दिपक पाटील यांनी मला " पाच, पाच करा की" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "पाच, पाच हजार" असे विचारले असता त्यांनी होकारार्थी मान हालवून बाजूस निघून गेले. दिपक पाटील, निरीक्षक यांनी आमचे शाळेचा चेक काढलेचे मोबदल्यात माझेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच 1 पाटील असे घोळवे मॅडम बसत असले ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी त्या दिसत नसल्याने मी माझे मोबाईल नंबर 9860393938 वरून घोळवे मॅडम यांचे मोबाईल नंबर 9604170344 वरती फोन करून मोबाईलचा स्पिकर सुरु केला. त्यावेळी मी त्यांना कार्यालयात आलेचे सांगितले असता त्यांनी मला त्या 10 ते 15 मिनिटामध्ये कार्यालयामध्ये येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच पाटील असे कार्यालयाचे बाहेर व्हरांड्यामध्ये थांबून मॅडमची वाट पाहिली. काही वेळानंतर श्रीमती घोळवे या कार्यालयात जाताना दिसल्या. त्यानंतर मी व पंच पाटील असे दोघे कार्यालयात जावून श्रीमती घोळवे मॅडम यांची भेट घेतली. त्यावेळी मी घोळवे मॅडम यांना "एनटीची फाईल गेल्या...वर...ह्या आठवड्यात येईल" असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला "आपण थोडस चर्चा करू.... आपल्याला रूटींगली करायच हाय" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "जरा तुम्ही सांगा, त्या बेतात आपण करू" असे म्हणालो असता घोळवे मॅडम यांनी "पाच करा" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "पाच लाख, राऊंड फिगर" असे विचारले असता त्यांनी "साठ साठच्या हिशोबान" असे सांगितले. त्यावर मी त्यांना "पाच लाख रूपये करू?" असे म्हणालो. त्यावर त्यांनी होकार दर्शक मान हालवून "पाच राऊंड फिगर द्यायला लागेल" असे म्हणून "फडणीसला द्यायला लागेल" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "आत्ता तिस लाख आलेत, त्याचे किती करू" असे विचारले असता त्यांनी "अडीच करा" असे सांगितले. त्यावर मी त्यांना "अडीच लाख रूपये असे विचारले असता त्यांनी "हा" असे म्हणून "दोन हप्त्यात" असे सांगितले. त्यावर मी त्यांना "अडीच करण्यापेक्षा एक लाख रूपये देतो आज....दुसरा हप्ता आला की चार लाखापर्यंत फायनल करू सगळ" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "हा ठिक हाय... तुम्ही कधी पण द्या" असे म्हणून "मॅडमचा विषय वरच्या वर करा....माझ्याकडून मी थोडफार मॅडमला देते" असे म्हणाल्या.
त्यानंतर मी त्यांना "कुठल्या मॅडमला द्यायच" असे विचारले असता त्यांनी "फडणीस मॅडम" असे सांगून "त्यांचेकडे विषय हाय" असे सांगितले. त्यावर मी त्यांना "त्यांचा काय विषय हाय मिटवून टाकतो...चालतय एटीएम मधून काढून येतो" असे म्हणून मी व पंच पाटील असे तेथून बाहेर आलो आणि काही वेळानी फडणीस मॅडम यांची भेट घेवून त्यांना "मॅडमशी आता चर्चा झाली...तुम्हाला किती द्यायच" असे विचारले त्यावर फडणीस मॅडम यांनी "माझा काय विषय नाय" असे म्हणून नकार दिला. त्यानंतर मी त्यांना आमचे संस्थेच्या एनटीची फाईल झेरॉक्स काढण्यासाठी मागितली. त्यावेळी त्यांनी मला आमचे संस्थेची एनटीची फाईल दिल्याने मी व पंच पाटील असे कार्यालयातून खाली येवून माझेकडील कारने समाज कल्याण विभाग, सांगली येथून रवाना होवून भिलारे साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच पाटील यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने भिलारे साहेबांनी श्रीमती घोळवे, सहाय्यक संचालक बहुजन कल्याण विभाग सांगली यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, श्रीमती घोळवे, सहाय्यक संचालक बहुजन कल्याण विभाग सांगली आमचे संस्थेस शासनामार्फत मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा पहिला हप्ता 29,70,000/- रूपये दिलेचा मोबदला म्हणून व दुसरा हप्ता 29,70,000/- रूपये मंजूर करण्यासाठी माझेकडे 6,00,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 5,00,000/- रूपये व त्यानंतर 2,50,000/- रूपये व पहिला हप्ता 1,00,000/- लाचेची मागणी करून निरीक्षक फडणीस मॅडम यांचेकरीता लाचेची मागणी केली व मी निरीक्षक फडणीस यांना लाच रक्कम द्यावी याकरीता मला प्रोत्साहन देवून लाच रक्कमेचा पहिला हप्ता 1,00,000/- रूपये लागलीच घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. व दिपक पाटील, निरीक्षक यांनी आमचे शाळेच्या अनुदानाचे चेक दिलेचा मोबदला म्हणून माझेकडून 10,000/- रूपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी श्रीमती घोळवे मॅडम यांचेविरूध्द समाज कल्याण विभाग सांगली येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम 1,00,000/- रूपये हजर करण्यास



Scanned with OKEN Scanner

सांगीतले. त्याप्रमाणे मी लाच म्हणुन द्यावी लागणारी माझेकडील शिल्लकीतील 1,00,000/- रुपये रक्कम भिलारे साहेब यांचे समक्ष हजर केली. त्यानंतर श्री. भिलारे साहेब यांनी लाच रक्कमेतील नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. भिलारे साहेब यांनी सही केली. श्री. भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व भिलारे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच पाटील असे माझेकडील कार मधून रवाना होवून समाज कल्याण विभाग सांगली येथे दाखल होवून इतर बहुजन कल्याण विभाग सांगली कार्यालयात गेलो. त्यावेळी श्रीमती घोळवे मॅडम हया त्यांचे कक्षामध्ये दिसत नसल्याने मी त्यांचेबाबत विचारणा केली असता त्या मिटींगसाठी गेले असल्याचे सांगितल्याने मी व पंच पाटील असे बाजुस थांबून श्रीमती घोळवे मॅडम यांची वाट बधितली. काही वेळानंतर श्रीमती घोळवे मॅडम हया त्यांचे कक्षामध्ये आलेनंतर मी व पंच पाटील असे त्यांचेकडे जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी श्रीमती घोळवे मॅडम यांनी माझ्याकडे हाताने इशारा करुन लाचेची मागणी केली. मी त्यांना एक लाख रूपये आणले असल्याचे सांगून "चार लाख आठवडा झाला की देतो" असे म्हणून माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये अँथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली 1,00,000/- रूपये लाच रक्कम उजवे हाताने बाहेर काढून श्रीमती घोळवे मॅडम यांचे टेबलवर ठेवली. त्यावेळी घोळवे मॅडम यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने उचलून त्यांचे पर्समध्ये ठेवून "ठिक हाय" असे म्हणाल्या. लागलीच मी कार्यालयातून बाहेर येवून माझेकडील हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला.

लागलीच भिलारे साहेब व सापळा पथक माझेजवळ आले व भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने श्रीमती घोळवे मॅडम यांना ताब्यात घेतले.

सदर ठिकाणी भिलारे साहेबांनी श्रीमती घोळवे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती सपना सुखदेव घोळवे, वय-40 वर्षे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, अतिरिक्त कार्यभार सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग सांगली, वर्ग-1, रा.जिल्हा परिषद निवास, रूम नं.01 पहिली बिल्डींग जिल्हा परिषद समोर सातारा, मुळ रा. रूम नं. बी-9, वक्रतुं◌ंड सोसायटी, बनकरनगर धायरी पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SANJAY SHIVAJIRAO MORE
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** PBMAH72651
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY SHIVAJIRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH72651

LHC1346 खोत
ठाणे अंमलदार
सांगली शहर पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner